परिपत्रक क्रमांक 308 दिनांक 7/2/2004

धर्मादाय संघटनेच्या सर्व कार्यालय प्रमुखास कळविण्यांत येते की, केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय पाणलोट विकास योजना राबविण्यासाठी लघुपाणलोट स्तरावर पाणलोट संघ स्थापन करावयाचे असून पाणलोट क्षेत्र विकासाच्या योजना केंद्र शासन पुरस्कृत असून सदर संस्था नोंदणी झाल्याखेरीज विकास कामे करता येऊ शकत नाहीत. त्यामुळे पर्यायाने केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा उपयोग करता येत नाही. तरी पाणलोट विकास कामांना चालना मिळण्यासाठी आपल्या कार्यालयात दाखल झालेल्या पाणलोट क्षेत्र विकास संबंधीत संस्थांची सार्वजनिक संस्था नोंदणी कायदा 1860 अन्वये नोंदणी प्रकरणाची पूर्तता त्वरीत करुन घेऊन सदर संस्था नोंदणी शीघ्रगतीने व प्राधान्याने केली जावी व त्याबाबत सर्व संबंधीतास सूचना देण्यात याव्यात.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत :- कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
यंाचे पत्र क्रमांक 142 दिनांक 20/1/2004 ची प्रत.